-: प्रेसनोट दिनांक - ३०/०८/२०१९ :-

**आरोपी लोकसेविका अ.नं. १ श्रीमती शालन कृष्णात माने, वय-५३, कनिष्ठ सहायक, पंचायत समिती (बांधकाम विभाग), कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, वर्ग-३ यांनी आरोपी लोकसेवक अ.नं.२ बाळु आनंदा निकम, वय-५०, मैल कामगार पंचायत समिती (बांधकाम विभाग), कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर, वर्ग-४ यांचे मार्फत १०००/- रुपये लाचेची रक्कम (बक्षीस) स्विकारलेने त्यांना रंगेहात पकडलेबाबत.**

---

तक्रारदार या पंचायत समिती कागल, (बांधकाम विभाग) ता.कागल, जि.कोल्हापूर येथे शिपाई या पदावर कार्यरत आहेत. त्याच ठिकाणी आरोपी लोकसेविका अ.नं.१ श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक म्हणून कार्यरत आहेत.

तक्रारदार या कार्यरत असलेल्या पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग) येथील आरोपी लोकसेविका अ.नं.१ श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक यांनी तक्रारदार यांची तीन ते चार दिवसापूर्वी भेट घेवून त्यांना मी तुमचा १६ नंबरचा फॉर्म तुम्हाला दिला आहे. तसेच तुमचा पगार देखील सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निश्चती करुन काढला आहे. त्याकरीता तुम्ही मला १०००/- रुपये द्यावे लागतात असे सांगून, त्यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपयांची मागणी केली. त्याबाबत तक्रारदार यांनी पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग) येथील श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक यांचेविरुध्द दिनांक २९/०८/२०१९ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कार्यालयाकडे तक्रारी अर्ज दिला.

तक्रारदार यांचे तक्रारी प्रमाणे दिनांक २९/०८/२०१९ रोजी शासकीय पंच साक्षीदारांचे समक्ष लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता, पडताळणी मध्ये पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग) येथील श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक यांनी तक्रारदार यांना मी तुम्हाला १६ नंबरचा फॉर्म दिला आणि तुमचा पगार देखील सातव्या वेतन आयोगा प्रमाणे वेतन निश्चती करुन काढला आहे असे सांगून त्यांनी तक्रारदार यांचेकडे १,०००/- रूपये लाचेची मागणी केली असल्याचे पडताळणी मध्ये निष्पन्न झाले.

आज दिनांक ३०/०८/२०१९ रोजी पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग) येथील श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक यांचेविरुध्द पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग) कागल, ता.कागल, जि.कोल्हापूर या ठिकाणी सापळयाचे आयोजन केले असता, पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग) येथील श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक यांनी तक्रारदार यांचेकडे १०००/- रुपये लाचेची (बक्षीस) मागणी करुन ती लाच रक्कम आरोपी लोकसेवक अ. नं.२ बाळु आनंदा निकम, मैल कामगार पंचायत समिती (बांधकाम विभाग), कागल यांच्याकडे देण्यास सांगितली. त्याप्रमाणे तक्रारदार यांनी आरोपी लोकसेवक अ.नं.२ बाळु निकम, मैल कामगार यांची भेट घेतली असता, त्यांनी तक्रारदार यांचेकडून १०००/- रुपये लाचेची रक्कम (बक्षीस) स्विकारली. त्यावेळी त्यांना रंगेहात पकडणेत आले.

आरोपी लोकसेविका अ.नं. १ श्रीमती शालन कृष्णात माने, कनिष्ठ सहायक यांना व आरोपी लोकसेवक अ.नं. २ बाळु आनंदा निकम, मैल कामगार पंचायत समिती कागल (बांधकाम विभाग), कागल, जि.कोल्हापूर यांना ताब्यात घेण्यात आले असून त्यांच्याविरुध्द कागल पोलीस ठाणे, ता.कागल, जि.कोल्हापूर येथे गुन्हा नोंद करणेची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई श्री.राजेश बनसोडे पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे व श्रीमती सुषमा चव्हाण, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शना नुसार, श्री.आदिनाथ बुधवंत, पोलीस उपअधीक्षक, श्री.जितेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक, सफौ.शाम बुचडे, पोना.शरद पोरे व पोकॉ.रुपेश माने, मपोकॉ.छाया पाटोळे, चालक पोहेकॉ.विष्णू गुरव, ॲन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करणेत येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबत तकारी असल्यास लाच लुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

१) मा.महासंचालक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग,म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१

२) मा.पोलीस अधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे
दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३

३) श्री.आदिनाथ बुधवंत , पोलीस उपअधीक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, कोल्हापूर मो.नं.- ९०११२२८३३३. ०२३१/२५४०९८९.

४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक :- १०६४.

५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३